जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर

P.R.O. OFFICE, DCP ZONE-3, THANE CITY

Address- Office of Dy. Commissioner of Police, Zone-3,
Wayle Nagar Khadakpada, Kakyan
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819028279

THANE POLICE COMMISSIONERATE

प्रेसनोट दिनांक- १०/०२/२०२६

मोठागांव ते मानकोली उड्डाण पुलावर रेस लाऊन, स्टंटबाजी करणाऱ्या वाहनचालकांवर विष्णुनगर पोलीस ठाण्याकडून कारवाई.

दिनांक २६/१/२०२६ रोजी काही वाहन चालकांनी विष्णुनगर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील मोठागांव ते मानकोली असे जाणाऱ्या उड्डाण पुलावर भरधाव वेगात वाहने चालवून, स्टंटबाजी केल्याबाबतची चित्रफित प्रसारमाध्यमांवर प्रसारीत झाली होती. त्याअनुषंगाने विष्णुनगर पोलीस तसेच शहर वाहतूक शाखा डोंबिवली उप विभाग यांनी वाहनचालकांवर खालील प्रमाणे कारवाई केलेली आहे.

१) थार जिप क्रमांक MH05-FG-5656 चा चालक पियुष द्वारकानाथ म्हात्रे, वय २१ वर्षे, याच्यावर मोटार वाहन कायदा कलम १००(२)/१७७ प्रमाणे कारवाई करून १५०० /-रूपये दंड तसेच दंडाची थकबाकी ३५००/-रूपये वसूल करण्यात आलेली आहे.

२) होंन्डई वेरणा कार क्रमांक MH05-GD-0049 चा चालक वेदांत महेश सावंत वय १८ वर्षे, याच्यावर मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

३) स्कॉर्पिओ जिप क्रमांक MH05-CV-3988 या गाडीतून सदर भरधाव वेगात रेसींग करणाऱ्या गाडयाचे व्हिडीओ काढणारे इसम विशाल दिनेश विश्वकर्मा, वय २२ वर्षे, कृष्णा जितेंद्र विश्वकर्मा,वय १९ यांच्या विरोधात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १९५१ चे कलम ११२/११७ प्रमाणे कारवाई केलेली आहे.

४) स्कॉर्पिओ जिप क्रमांक MH46-CR-4111 या गाडीचा चालक प्रदीप आंबादास ढाकणे, वय २१ वर्षे याच्यावर मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

ठाणे आयुक्तालयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की,मानकोली ब्रिज सारख्या उड्डाणपुलावर भरधाव वेगात कार, मोटर सायकल चालविल्यास अपघाता सारखा गंभीर प्रकार घडून चालक स्वतः तसेच इतरांच्या मृत्यूस कारणीभूत होऊ शकतो. त्यामुळे भविष्यात असे प्रकार करणाऱ्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

वरील नमूद कारवाई ही मा.पोलीस उप आयुक्त सो.परिमंडळ ३ कल्याण, मा.सहा.पोलीस आयुक्त, डोंबिवली विभाग यांच्ये मार्गदर्शनाखाली विष्णुनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राम चोपडे, सहा. पोलीस निरीक्षक प्रशांत मोरे, सचिन लोखंडे ,विष्णुनगर पोलीस ठाण्याचे पोलीस पथक, शहर वाहतूक शाखा डोंबिवलीचे पोलीस पथक यांनी केलेली आहे.


MH05FG5656


MH05GD0049
DRAGON BALL Z